# पुणे ते रत्नागिरी सायक्लोथॉन

**पुणे** : समाजातील दुर्बल घटकांना मदत करण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने पुणे ते रत्नागिरी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ही सायक्लोथॉन आठ ते १२ डिसेंबरदरम्यान चालणार आहे.

उपक्रमात 'बायसिकल्स एंजल्स'चा सहभाग आहे. पाच दिवसांच्या सायकल प्रवासादरम्यान 'बायसिकल एंजल्स'च्यावतीने गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठी सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. फिनोलेक्स कंपनीच्या सहकार्याने शिरवळ, उंब्रज, कोकरुड, आणि पाली या चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. 'बायसिकल एंजल्स'चे संस्थापक, चित्रपट निर्माते राकेश बक्षी आणि इंग्लंडमधील प्रसिद्ध कान-नाक-घसा तज्ज्ञ प्रा. राम धिल्ला हे दोन व्यावसायिक सायकलपटू आणि 'एमएमएफ'ची टीम हा प्रवास करणार आहे, अशी माहिती 'एमएमएफ'च्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी दिली.

गेल्या वर्षीच्या सायक्लोथॉनमध्ये दोन हजार ३१३ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली होती, तर २७ विद्यार्थ्यांना चष्मे वाटण्यात आले होते. सेरेब्रल पाल्सीच्या मुलांसाठी येत्या जानेवारी २०१६पर्यंत बसण्याच्या विशेष खुर्च्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.